Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५६ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.८ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## अमित शहा शेपूट घाले गृहमंत्री

# मोदींना कचऱ्याच्या डब्यात जाण्यापासून बाळासाहेबांनी वाचवले-उद्धव ठाकरे

**धाराशिव–अमित शहा शेपूट घाले गृहमंत्री आहेत. मणिपूर पेटले. तेव्हा तिकडे जायची हिंमत केली नाही. या नागोबाकडे काश्मीरमध्ये जायची हिंमत नाही. अरुणाचलमध्ये चीन घुसतोय. मात्र, या सगळ्या ठिकाणी त्यांनी शेपूट घातले. मात्र, महाराष्ट्रात येऊन ते आमच्यावर फणा काढतायत, असा शब्दा उद्धव ठाकरे यांनी अमित शहांवर टीकेची झोड उठवली.शिवसेनाप्रमुख होते म्हणून मोदींची ओळख झाली. अटलबिहारी वाजपेयी मोदींना कचऱ्याच्या डब्यात टाकायला निघाले होते. मात्र, तेव्हा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेबांनी त्यांना वाचवले नसते, तर मोदी आज दिसलेच नसते म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या प्रमुख नेत्यांचा समाचार घेतला. ते धाराशिव जिल्ह्यातल्या औसा येथील सभेत बोलत होते.**



उद्धव ठाकरे म्हणाले की, शिवसेना फोडल्यानंतर त्यांना वाटले शिवसेना संपेल. मात्र, शिवसेना संपणार नाही. भाजपला संपवून, गाडून, मूठमाती देऊन शिवसेना पुढे जाईल. महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर झालेली रिक्षा असल्याचा शोध अमित शहा यांनी लावला आहे. ठीक आहे आमची सर्वसामान्यांची रिक्षा पंक्चर आहे. मात्र, तुमच्या ट्रिपल इंजिन सरकार तर भ्रष्टाचाराची चाके लागलेली असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. भ्रष्टाचारी तितुका मिळवावा, असे सध्या भाजपचे चालले असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.आम्ही मोदींचा फोटो लावून जिंकलो असल्याचा दावा तुम्ही करतात. मात्र, मोदी हे नावही जेव्हा माहित नव्हते, तेव्हाही आम्ही धाराशिवची जागा जिंकत होतो. अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी भाजपावर पलटवार केला. शिवसेना प्रमुख होते म्हणून तुम्हाला मोदी दिसत आहेत, असे मी देखील म्हणू शकतो, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. अटल बिहारी वाजपेयी जेव्हा मोदींना कचऱ्याच्या टोपलीत टाकायला निघाले निघाले होते, तेव्हा पूर्ण देशात एकमेव हिंदुह्यसम्राट बाळासाहेब ठाकरे होते, ज्यांनी मोदींना वाचवले होते, असेही उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. भाजपच्या आता लक्षात आलं आहे की, महाराष्ट्रात मोदींचे नाणे चालू शकत नाही. मोदी खोटा सिक्का आहेत, म्हणून त्यांनी शिवसेना फोडली असल्याचा आरोप उद्धव ठाकरे केला आहे.माझे वडील चोरण्यापेक्षा स्वतःचे वडील आहेत, त्यांचे फोटो लावून निवडून येऊन दाखवा. स्वतःच्या वडिलांवर एवढा विश्वास नाही का? अशी खोचक टीका देखील उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केली. माझे कुटुंब माझी जबाबदारी अशी घोषणा मी दिली होती. तुम्ही मात्र, अर्धवट घोषणा देत आहात. मोदी का परिवार एवढीच घोषणा दिली जात आहे. मात्र त्या परिवाराची जबाबदारी कोण घेणार, हे मोदी सांगत नसल्याचे, उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.ज्या ज्या वेळी पाठीवर वार होतो, त्यावेळी दुश्मनाचा कोथळा काढण्याची शिकवण आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांनी दिली असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. 'नमो महारोजगार' मेळावा म्हणजे इतर पक्षातील भ्रष्टाचाऱ्यांना भाजपमध्ये घ्यायचं आणि त्यांना कामाला लावायचं! अशा शब्दात त्यांनी सरकारच्या या वेळाव्यावर टीका केली. घटनाबाह्य सरकारसारखी ८४ कोटी रुपयांची जाहिरात करण्यापेक्षा, त्या पैशात मी माझ्या शेतकऱ्याच्या पिकाला भाव दिला असता, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. निवडणूक रोख्यांमधून भाजपने हजारो कोटी जमवले. मग देशाला लुटलं कुणी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## समृद्धीवरून जाणाऱ्या वाहनांना कर्मचाऱ्यांच्या संपामुळे भुर्दंड

# केवळ प्रवेशाचीच नोंद,बाहेर पडल्याची नोंद नसल्याने फासस्टॅगमधून कपात



**वैजापूर–**जर तुम्ही समृद्धी महामार्गावरून प्रवास करत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची आहे. आपले वाहन समृद्धी महामार्गावर प्रवेश करतांना त्याची नोंद होते, परंतु बाहेर पडतांना नोंद होत नाही. त्यामुळे आपल्या खात्यातील किती रक्कम कपात झाली अथवा किती भुर्दंड बसला हे तपासणे गरजेचे आहे.

मंगळवारपासून समृद्धी महामार्गावरील टोल नाक्यावरील कर्मचारी मागण्यांसाठी संपावर गेलेले आहेत. वर्षभरापासून समृद्धी महामार्गावरील टोल कर्मचाऱ्यांनी वेळेवर वेतन मिळावे, पीएफचा लाभ, पगार स्लिप या मागण्यांसाठी अनेकदा आंदोलने केली. मात्र टोल कंपनीने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे टोल कर्मचाऱ्यांनी दि ५. पासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. यामध्ये छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील माळीवाडा, सावंगी, लासूर स्टेशन, जांभरगाव यासोबतच अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील कर्मचाऱ्यांनीही सहभाग घेतला आहे. त्यामुळे समृद्धीवर येणाऱ्या आणि महामार्गावरून बाहेर पडणाऱ्या वाहनांची नोंद घेण्याचे काम ठप्प झाले आहे. वाहनांची नोंद करण्यासाठी कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावतात. कर्मचारी संपावर असल्याने हे काम बंद झाले आहे. त्यामुळे वाहनचालकाच्या फास्टटॅग मधून नागपूरपासून संपूर्ण टोलचे पैसे वसूल केले जातात. यात कंपनीचा तोटा नाही, मात्र वाहनधारकांना भुर्दंड बसत आहे. त्यामुळे संपावर लवकर तोडगा निघावा, अशी अपेक्षा वाहनचालक व्यक्त करत आहेत.समृद्धी महामार्गावर चढत असताना प्रत्येक वाहनाच्या प्रवेशाची नोंद होते. मात्र वाहन बाहेर पडताना नोंद होत नाही. त्यामुळे ४८ तासांच्या आत वाहने बाहेर पडल्याची नोंद झाली नाही, तर संबंधित वाहनाच्या फास्टटॅग मधून नागपूरपासून संपूर्ण समृद्धी महामार्गाचा टोल वसूल केला जातो. ज्यामध्ये कारसाठी ८००हून अधिक रुपयांचा, तर ट्रकला २८०० ते ५५०० रुपये पर्यंत दंड लागू शकतो. कर्मचाऱ्यांनी संप केला तेव्हा महामार्गावर चढणाऱ्या वाहनाची प्रवेश नोंद होते. मात्र, बाहेर पडत असल्याची नोंद होत नाही.

## मी बोललो म्हणजेच पक्ष बोलला

# जागावाटपावरुन छगन भुजबळांनी दिले मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना प्रत्युत्तर

**मुंबई–**राज्यामध्ये सध्या सर्व आघाडींमध्ये जागावाटपावरुन चर्चासत्र सुरु आहेत. बैठकांचे सत्र सुरु असताना जागावाटपावरुन आघाडींमध्ये बिघाडी होत असल्याचे बोलले आहे. अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी त्यांच्या पक्षाला काही जागा पाहिजेत याबाबत वक्तव्य केले होते. यावर भाजप नेत्यांनी ही त्यांची वैयक्तिक मागणी असल्याचे सांगितले. यानंतर मंत्री भुजबळांनी भाजप नेत्यांना चोख प्रत्युत्तर दिले असून मी बोललो म्हणजेच पक्ष बोलला असे वक्तव्य मंत्री छगन भुजबळ यांनी केले.छगन भुजबळ यांनी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर महायुतीत एकनाथ शिंदे गटाइतक्याच जागा अजित पवार गटाला द्यायला हव्यात असे वक्तव्य केले आहे. परंतु, भुजबळांची मागणी व्यक्तीगत आहे, अशी प्रतिक्रिया भाजप नेते आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. यानंतर बोलताना भुजबळ माझे मत तेच आमच्या पक्षाचे मत आहे. ते काही माझे वैयक्तिक मत नाही. भुजबळ बोलतो तेव्हा पार्टी बोलते, असे भुजबळांनी म्हटले आहे.दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, मुनगंटीवारांनी त्यावर बोलण्याचं कारण नाही. प्रसारमाध्यमांनी काहीतरी विचारल्यावर ते काहीतरी सांगणार मुनगंटीवार यांनी सागितल्याप्रमाणे आम्ही जागा घेणार नाही. त्यांचे दिल्लीचे लोक आहेतदिल्लीश्वर आणि इथल्या प्रमुख नेत्यांशी चर्चा करून जागांचे योग्य वाटप होईल.भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी उत्तर देताना हे मत भुजबळ यांचे वैयक्तिक असल्याचे सांगितले. मुनगंटीवार म्हणाले, छगन भुजबळ यांनी मागणी केली आहे की एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला जितक्या जागा मिळतील तितक्या जागा त्यांच्या पक्षाला (अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) द्यायला हव्यात, ती त्यांची व्यक्तीगत मागणी आहे. त्यांच्या पक्षातील अजित पवार, प्रफुल्ल पटेल किंवा सुनील तटकरे यांच्यापैकी जे नेते पक्षाचे संघटनात्मक काम पाहतात ते आमच्या नेत्यांशी म्हणजेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि इतर वरिष्ठांशी बोलतील आणि जागावाटपावर योग्य तोडगा काढतील, असे मत सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांना शुद्धलेखणा पासून शुद्ध वागण्या पर्यंतचे सर्व शिक्षण देणे गरजेचे-खासदार मेधा कुलकर्णी





**पुणे–**छडी लागे छम छम ची भाषा जरी आपल्याला आता करता येत नसली तरी चुकांना चूक म्हटल्याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये दुरुस्ती कशी येईल? शुद्धलेखणा पासून शुद्ध वागण्यापर्यंत सर्व गोष्टी महत्वाच्या आहेत. प्रत्येक गोष्टीचे काही नियम असतात त्या नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. देश कधी मागे राहत नसतो तर देशाचा माणूस मागे राहिला तर देशाचा विकास मंदावतो. त्यामुळे देशाला पुढे न्यायचा असेल तर शाळेमधील विद्यार्थ्यांच्या कृतीला, प्रयोगाला पुढे नेणे हे शैक्षणिक संस्था आणि शिक्षकांचे कर्तव्य आहे असे प्रतिपादन खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९२३ साली स्थापन झालेली विद्या प्रसारणी सभा शंभराव्या वर्षात वाटचाल करत असून संस्थेचा शताब्दी महोत्सव वर्षभर साजरा केला गेला. याच शताब्दी महोत्सवचा सांगता समारंभ भारत इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महविद्यालय, शिवाजी नगर, येथे आयोजित करण्यात आला होता, त्या प्रसंगी मेधा कुलकर्णी बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष डॉ. वा.मा. औटी (अध्यक्ष–विद्या प्रसारिणी सभा), पुणे विद्यापीठाचे प्र–कुलगुरु डॉ. पराग काळकर, आमदार सिद्धार्थ शिरोळे, सुरेखा जाधव (नगराध्यक्ष लोणावळा नगरपरिषद), संस्थेच्या नियामक मंडळ अध्यक्षा डॉ. मृणालिनी गरवारे, डॉ. सतीश गवळी (कार्यवाह– विद्या प्रसारिणी सभा), सहकार्यवाहक विजय भुरके, शताब्दी महोत्सव प्रमुख डॉ. हिरेन निरगुडकर आदी मान्यवर उपस्थित होते.मेधा कुलकर्णी म्हणाल्या, शाळांमध्ये देशाचा इतिहास, देशाचा वर्तमान आणि देशाचे भविष्य घडतं. भारताचे उज्वल भविष्य कुठे पहायचं असेल तर ते या वर्ग खोल्यांमध्ये दिसेल. हेच भविष्य घडवण्याचे काम विद्या प्रसारिणी सभेने गेले शंभर वर्ष केले आणि पुढील शंभर वर्ष देखील करेल. त्यासाठी शासन, प्रशासन व सरकार स्तरावरील काही सहकार्य लागत असेल तर त्यासाठी मी नक्की प्रयत्नशील राहील असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी व्यक्त केले.प्र–कुलगुरु पराग काळकर म्हणले, पूर्वी महाविद्यालय, शैक्षणिक संस्था ह्या इमारतीवर गणल्या जायच्या. मात्र आता भिंतीच्या पलीकडे जाणारे आणि माणूस घडवणार शिक्षण गरजेचे आहे. क्वांटिटी पेक्षा कॉलिटी महत्त्वाची आहे. कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा विद्यार्थी हाच त्याचा ब्रँड असतो. त्यामुळे आम्ही किती विद्यार्थ्यांना शिक्षण दिले त्यापेक्षा कोणत्या आणि कशा विद्यार्थ्यांना आपण घडवले हे जास्त महत्वाचे येणाऱ्या काळात असेल.

# शिंदे,अजितदादांचे उमेदवार असतील पण चिन्ह कमळ-बच्चू कडूंचा दावा

**मुंबई–**लोकसभा निवडणुकीचे रणसंग्राम सुरू झालेले आहे. जागावाटपाबाबत महायुतीच्याही बैठका होत आहेत. अशातच आमदार बच्चू कडू यांनी अतिशय महत्त्वाचे विधान केले आहे. भाजप महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्वाधिक जागा लढू शकते. विशेष करून शिंदे आणि अजित दादा यांचे उमेदवार असतील पण त्यांना कमळ चिन्हावर निवडणूक लढावी लागेल, असा दावा आमदार बच्चू कडू यांनी केला.

लोकसभा निवडणूक आमच्यासाठी दुय्यम आहे. विधानसभा निवडणूक आमच्यासाठी प्रथमस्थानी आहे. विधानसभेची बोलणी नाही तर मग लोकसभेच्या ४०० च्या पार वाट्यात आमचा काय संबंध येतो? महायुतीच्या बैठकींचं मला आमंत्रण आलं नाही आणि आमंत्रण आलं तरी जायची इच्छा नाही देखील नाही, असे बच्चू कडू म्हणाले. अमित शहा सध्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. त्यांच्या या दौऱ्यावर आणि जागावाटपावर बच्चू कडू यांनी भाष्य केले आहे.कडू म्हणाले की, आमची राजकीय बांधिलकी कोणासोबतच नाही. महाराष्ट्रात सगळ्याच जागा भाजप लढू शकतो. एकनाथ शिंदे गटाचे आणि अजित दादा गटाचे उमेदवार राहतील. पण चिन्ह कमळ राहील. शिंदे साहेबांची शिवसेना दिसली पाहिजे. तुम्ही जर त्यांना काखीत दाबून



ठेवल तर बिचवा काढायची वेळ आली नाही पाहिजे, असं बच्चू कडू म्हणाले. आमची मानसिकता विधानसभेची फक्त अमरावती किंवा अकोलामध्ये निवडणूक लढू, असे बच्चू कडू म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी सक्षम आहेत. नवनीत राणा यांना धमकी देणाऱ्यांना पाकिस्तानातून अफगाणिस्तानमधून ओढून आणलं पाहिजे. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधून नवनीत राणांना धमकी येत असेल तर मोदी सरकारवर प्रश्नचिन्ह आहे. मोदींच्या सरकारमधील खासदाराला जर धमकीत असेल तर मग कायदा कुठे राहिला? निवडणुका आहे म्हणून एका धर्माला टार्गेट केलं जातं. निवडणुका जवळ आहे तर हिरवा येईल भगवा येईल निळा झेंडा बाहेर येईल, असं बच्चू कडू म्हणाले.

# आंतरराष्ट्रीय मोबाइल क्रमांकावरून खासदार नवनीत राणा यांना धमकी

**अमरावती–**अमरावती। खासदार नवनीत राणा यांना मागील तीन ते चार दिवसांपासून सातत्याने एका आंतरराष्ट्रीय मोबाइल क्रमांकाप्रमाणे असलेल्या क्रमांकावरून धमकीचे व्हॉइस रेकॉर्डिंग मेसेज येत आहेत. याप्रकरणी खासदार राणा यांचे स्वीय सहाय्यक विनोद गुहे यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात मंगळवारी तक्रार दिली. तक्रारीवरून मंगळवारी उशिरा रात्री पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. खासदार नवनीत राणा यांच्या वैयक्तिक मोबाइल क्रमांकावर हे व्हॉइस रेकॉर्डिंग मेसेज येत आहेत. त्यामध्ये भाजपमधील काही वरिष्ठ नेत्यांच्या नावांचा उल्लेख करून तुम्ही अलीकडे संबंधित नेत्यांच्या संपर्कात जास्त आहात, ते योग्य नाही. आम्ही त्या नेत्यांसह तुम्हालाही पाहून घेऊ, अशा आशयाची धमकी व्हॉइस रेकॉर्डिंगमधून दिली असल्याचे पोलिस तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी तक्रार दिली असून, गुन्हा दाखल झाल्याचे खासदार नवनीत राणा यांचे स्वीय सहाय्यक विनोद गुहे यांनी सांगितले आहे.

# महिलांच्या हक्क-लढ्याचे विस्मरण होऊ नये!

**भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः! या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो. अशी आपबिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांनी व्यक्त केली आहे... संपादक.**

महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. संपूर्ण विश्वाच्या पाठीवर इ.स.१९११ साली पहिल्यांदा जागतिक महिला दिन साजरा केला गेला. दिनांक २८ फेब्रुवारी १९०९ रोजी न्यूयॉर्क येथे पहिला महिला दिन साजरा करण्यात आला होता. तथापि सन १९१०च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषेदत मांडलेल्या सुचनेनुसार ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून निश्चित करण्यात आला. भारतीय संस्कृतीत महिलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पौराणिक ग्रंथामध्ये स्त्रीचे गुणगौरव केलेले दिसून येते. यत्र नार्यस्तु पुजंते, रमते तत्र देवतः! या पवित्र संस्कृत विधानाची आपल्याला आता खात्री पटली आहे. आपल्या देशात पुरुषसत्ताक पद्धती आहे, याचा बऱ्याच संधीसाधूंनी विपर्यास केला. स्त्रीला एक भोग्य वस्तू, डावी, गौण, अपशकूनी, अबला अशा आदी उपाध्यांनी तिचे श्रेष्ठत्व मलिन आणि दुबळे केले. परंतु तिच्या महात्म्याचे दर्शन किंवा अनुभूती एखाद्यालाच होते. हे आपण आज छातिठोक सांगू इच्छितो.घरात जोपर्यंत स्त्रीचा वावर असतो, तोपर्यंतच त्या घरास घरपण असते. म्हातारे लोक म्हणतात त्याप्रमाणे ती देवता- लक्ष्मीच असते. त्या घरात तिच्या सहवासाने जीवंतपणा, शांती, प्रेम, वात्सल्य, दया, नम्रता, हे दैवी गुण ठासून असतात. स्त्रीविरहित घर एकप्रकारचे स्मशान असते. कोरोनाच्या जबरदस्त प्रादुर्भावात सन २०२१मध्ये माझी प्रेमळ पत्नी- आशाताई मरण पावली आणि माझ्या घराची आण, बाण व शान पुरती धुळिला मिळाली. कोना न कोना प्रसन्न वाटणारा तेव्हा अडगळ भासू लागला. सगेसोयरे, शेजारी व समाज यांच्या दरम्यान प्रचंड मोठी दरी निर्माण झाली. त्यांचे पाहुणे म्हणून येणे, बसणे, ऊठणे, हसणे, खिदळणे, बागडणे सारे काही हराम झाले. अतिथी देवो भवः! या सुवर्ण क्षणासाठी मन आतुर होऊ लागले.ती माऊली गेल्यापासून घरातील शीतल साऊलीच हरपली, असे वाटत होते. घरात एका पाठोपाठ एक असे चार मांजरीचे पिल्लू पाळून पाहिले, मात्र तीनचार-तीनचार महिन्यांच्या अंतराने बिचारे मरतच गेले. आपणच महापातकी आहोत की काय? अशी अपराधीपणाची भावना मनात घर करून बसली आहे. घराच्या वळचणीत, खिडकीत किंवा विजेच्या तारांवर आपले घरटे बांधून रोज आनंदाने चिवचिवाट करणारी चिमणीही तेव्हा दिसेनाशी झाली होती. घरात इकडून तिकडे व तिकडून इकडे दिवसात कितीतरी चकरा मारणारी चिचुंद्री पण दिसेल तर शप्पथ! इतका मोठ्ठा फरक आपण त्या घटकेला अनुभवला आहे, हे पांढऱ्या शुभ्र स्पटिकाप्रमाणे सत्य आहे. नेहमी ये-जा करत असणारे आपले अत्यंत काळजीवाहू नातलगसुद्धा ही स्मशान शांतता अनुभवत होते. एवढा फरक काही काळ- दोन वर्षे घरात एकही स्त्री नसल्याने पडलेला दिसला. यावरून आपण सूज्ञ वाचक स्त्रीचे श्रेष्ठत्व मोठे किती? कसे? आणि का? याचा अंदाज अवश्य बांधू शकाल, यात तिळमात्रही शंका नाही! घरातली क्षुल्लकशी वाटणारी धुणे, भांडी, झाडलोट, स्वयंपाक, पाणी, आदी कामे उरकताना आपल्याला तारेवरची कसरत करावी लागत होती. घरबांधणी, घराची मालकी, राशनकार्ड, स्वयंपाकाचे गॅस कनेक्शन आधी सगळी जडावजड जबाबदाऱ्या तिने लिलया पेलल्या होत्या. खरे तर हे सगळे करताना आम्हास रडू कोसळत होते आणि ३३ कोटी देव आठवू लागले



होते. वेळेवर आम्ही बापलेक अंघोळ, स्वयंपाक, जेवण, कपडे धुणे कधी केले काय नि कधी ना केले काय? विचारतो तरी कोण? नेहमीचा अंघोळ करा, जेवण करा... असा कळवळ्याचा सज्जड दम विरला होता. काळयाकुट्ट अंधारातही काना न कोपऱ्यातील चकाकणाऱ्या वस्तू राहू द्या, परंतु लख्ख सूर्य प्रकाशातील अंगण तर सद्या घरात सर्व माणसे मृतप्राय शरीरेच असल्याची स्पष्ट साक्ष देत होते. घराचे घरपण, घरसजावट किंवा घरांगण स्वच्छता आदी एका स्त्रीजातीशिवाय शेकडो माणसेही पाहिजे तशी ठेवू शकत नाहीत. हे आज आपण पावन आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्त प्रामाणिकपणे मांडणे, आपले अहोभाग्य समजतोय! मागील वर्षी दि.१० फेब्रुवारी २०२३ रोजी मुलगा- इंजि.दुर्वांकुर यांचा विवाह उरकून सून- पल्लवीताई लक्ष्मीच्या पावलाने घरात आली आणि आमचा जीव भांड्यात पडला. आता खुप प्रसन्न वाटत आहे. तिनेही गृहलक्ष्मीची समस्त जवाबदारी आता समर्थपणे पेलून धरली आहे, हे येथे मला अभिमानाने नोंदवावे लागत आहे.भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. दि.८ मार्च १९७१ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे सन १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले, तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका, शाळा, महाविद्यालय व अन्य कार्यालयांमधूनही ८ मार्च साजरा होऊ लागला आहे. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा होताना दिसून येतो. इ.स.१९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले. सन १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा करावा, असे आवाहन का बरे केले असावे? क्रांतिसूर्य जोतीबा फुले, ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदींनी स्त्रीमुक्ती चळवळीत स्वतःला का समर्पित केले? याचे कोडे आज आपल्याला उलगडले आहे, हे पुनः पुन्हा सांगणे न लगेच!

!! जागतिक महिला दिनाच्या सर्व भगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**संकलन वशब्दांकन -**
**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**मोबा. नं. ७७७५०४१०८६.**

# स्त्री स्वातंत्र्य अबाधित संविधानामुळेच !

मनुस्मृतीत स्त्रीयांचा वेदाभ्यास व विद्या संपादन करण्याचा अधिकार नाकारण्यात आला. त्यात ब्राम्हण स्त्रीयांचा देखील समावेश होता. एवढेच नव्हे तर एखादा विद्यार्थी वेद वाचत असतांना स्त्री जर समोर आली असेल तर त्याने वेद वाचने थांबवावे, असेही मनुस्मृतीमध्ये लिहिल्या गेले आहे. म्हणजे स्त्रीयांच्या बाबतीत मनु किती खालच्या पातळीवर गेला होता, हे सिध्द होते. पाच हजार वर्षापूर्वीचे हे स्त्री-स्वातंत्र्य गेल्या ५०० वर्षापासून समाजाने स्वार्थापोटी बेडीत अडविले होते. भारतामध्ये जेवढी स्त्रीयांची मनुस्मृतीने अवनती झाली, तेवढी कोणत्याही देशात झाली नाही. स्त्रीयांना या देशात अत्यंत हीन व पुरुषापेक्षाही दुय्यम स्थान देण्यात आले. हे मनुवाद्यांना माहित असतांना कधीही त्यांनी मनुचा विरोध केला नाही किंवा मनुस्मृती जाळली नाही, कारण त्यात त्यांचा स्वार्थ दडलेला होता. स्त्रीयांच्या अवनतीला ब्राम्हणवादी व्यवस्था कारणीभूत आहे, हे सिध्द होते. आज २१ व्या शतकात स्त्रीचं क्षितीज खुप विस्तारीत झालं आहे. निसर्गातच स्त्री एक नाजुक तशीच धाकड, कणखर आणि त्यागाची मुर्ती समजली जाते. त्याचबरोबर तिच्यात सोशिकता व प्रचंड सहन शक्ति आहे, म्हणुनच कुठल्याही क्षेत्रात आज बेडरपणे महिला आघाडीवर आहेत. आपण कुणाचे गुलाम नाही, अन्याय-अत्याचार झाला, तर तो सहन करणार नाही, पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीने चालण्याचे समाधान आणि आत्मविश्वास त्यामुळे बळावतो. स्त्रीशक्ति इतकी बलाढय आहे की कोणत्याही परिस्थितीत ती स्वत:ला कमकुवत ठरु देत नाही, म्हणून तर त्यांनी निर्भय राहण्याचा चंग बांधला आहे.

अनेक वर्ष स्त्रीयांच्या भावना दाबल्या गेल्या म्हणून त्या आता उफाळून आल्या असं म्हणावं तर त्याचा अतिरेक झाला असं म्हणावं लागेल. स्त्रीमुक्ती हा विचार चळवळीचं रुप घेऊन आपल्याकडे आला आहे. वास्तविक स्त्रीमुक्ती हा शब्दच समाजानं उपहासात्मक करुन टाकला. स्त्रीमुक्ती या शब्दाची आणि त्यासाठी काम करणाऱ्या स्त्रियांना समान संधी मिळेल तेव्हा खिल्ली उडवत राहिला. तिला माणूस म्हणून जगायला मिळावं त्यासाठी स्वत: कुठल्याही तऱ्हेने पुरक न होता स्वातंत्र्यासाठी चाललेली तिची धडपड हास्यास्पद कशी ठरेल, याची वर उभे राहून वाट पाहत राहिला. तिच्याशी स्वत:चा काहीच संबंध नसल्यासारखा! तरीही उपहासाला थोडीही भीक न घालता स्त्री आज पाय रोवून उभी आहे. स्त्री-पुरुषातील विषमता, स्त्रीला पुरुषाने दिलेली गुलामीची वागणूक, तिच्यावर सदैव केलेली अरेरावी आजही वाढताहेत. शरीररचने पलिकडे अन्य कोणताही भेद स्त्री-पुरुषात असू शकत नाही म्हणून त्यांच्यासाठी सर्व कायदे, सर्व नियम सारखे असलेच पाहिजेत-भेदाभेद नको, तो अधिकार महिलांना मिळावा कारण व्यक्ती स्वातंत्र्यावरती हल्ला करणे लोकशाहीला अभिप्रेत नाही, तरी देखील प्रत्येक व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्याचे, आपला विचार निर्भिडपणे, अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडण्याचे स्वातंत्र्य भारतीय संविधानाने प्रत्येकाला दिलेत. समाजाच्या विचारात व मानसिकतेत बदल होणे आवश्यक असून तो बदलल्याशिवाय स्त्री-पुरुष समानता साधल्या जावू शकत नाही.भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, राज्यपाल आणि इतर प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीतून स्त्रीचा राजकारणाचा पैलु देखील उजागर होत असून हे संविधानामुळे शक्य होत आहे, याची जाणीव महिलांनी सुध्दा ध्यानात ठेवावी ते विसरुन चालणार नाही. संविधानामुळेच हा देश विकासशील राष्ट्रात मानाचं स्थान निर्माण करु शकला. देशाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या कालावधीत एक महिला म्हणुन श्रीमती निर्मला सितारामण यांना केंद्रीय संरक्षण मंत्री हे पद बहाल करुन देशाला गौरान्वित करण्यात आले. त्यांनी




नुकत्याच जम्मु काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यात झालेल्या दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या हुतात्मा झालेल्या ४२ जवानांच्या कुटूंबातील लोकांचे धाडस बांधण्याच्या दृष्टीने सांत्वनपर भेटी करीता पुढाकार घेतला, यावरुन देशासाठी काम करणाऱ्या स्त्रीयांची कमी नाही, हे वारंवार सिध्द होते. त्यांची प्रचिती नजरेत भरण्यासारखी आहे. पुन्हा आज त्या देशाचे अर्थमंत्री पद भुषवत आहेत. स्त्री ही अत्यंत कर्तबगार तर आहेच पण जीवनाच्या विविध आघाडयांवर शारीरिक व मानसिक



**प्रविण बागडे**
**जरीपटका, नागपूर - १४**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

कणखरतेने ती कार्य करु शकते, त्याचं हे धाडसी उदाहरण म्हणता येईल.थोडक्यात स्त्री-मुक्ति म्हणजे स्वातंत्र्याचा दुरुपयोग कुटुंब संस्थेला तडा नव्हे, स्त्री व पुरुष ही संसाररुपी स्थायी दोन समान चाके आहेत. ज्या रस्त्यावर हा रथ चालवायचा, तो रस्ता काही नियतीने अगदी गुळगुळीत करुन ठेवलेला नसतो. रस्त्यावर खाच-खडगे असणारच, संसाराचे देखील तसेच आहे. परस्पराच्या सामंजस्यातून हा संसाराचा रथ चालवावा लागतो त्याकरीता दोघांनीही त्याग करायला हवा. केवळ स्त्रीलाच त्यागाची, सहनशिलतेची मूर्ती बनवू नये. स्त्री-मुक्ति म्हणजे स्वत:चे व्यक्तिमत्व विकसीत करण्याचा हक्क प्राप्त करणे होय. १९९४ हे वर्ष खास महिलांसाठी धोरण आखणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आणि कालांतराने अशा महिला धोरणाचा राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली. तरी देखील गेल्या २५ वर्षाहूनही अधिक काळ राज्यात या महिला धोरणांची यशस्वीरित्या अंमलबजावणी होतांना दिसून येत नाही, ही शोकांतिका आहे. परंतू ती प्रत्यक्षात होत आहे किंवा नाही हे पाहणे महत्वाचे ठरते, त्यासाठी शासनाने एक समिती नेमावी. जी आपला अहवाल शासनाला अंमलबजावणीच्या संदर्भात सादर करीत राहील, हा पायंडा पाडण्याची गरज आहे.आज जन्माला आल्यावर पहिला संबंध आईशी म्हणजेच एका स्त्रीशी येतो. मानवी जीवनाचा उगम तिच्या पासुन होतो आणि म्हणून ती आपल्या सगळयांची निर्माती आहे. जगाचा स्त्रीकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोण असतांना देखील परिस्थिती बदलनं खुप कठीण होऊन बसतं. शिक्षणाच्या माध्यमातून लोकांची मानसिकताही बदलण्याची मोठया प्रमाणात गरज आहे. स्त्रीयां आणि मुलींसाठी कायदे आहेत, योजना आहेत, समान शिक्षणाच्या संधी देखील आहेत, पण समाजाने हे फायदे महिलांपर्यंत पोहचू न देण्याची मानसिकता कमी-अधिक प्रमाणात जाणवते. त्याची सुरुवात आई-वडीलांकडुन व्हायला हवी तरच मुलींना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि तेव्हाच कुठे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास बळावेल. तसा प्रयास 'दंगल' या चित्रपटात कुस्तीगीर म्हणुन फोगाट या व्यक्तिरेखेत स्त्रीला आणून एक नविन पायंडा निर्माण करण्यात आला, ही खरंच देशाभिमानी बाब आहे.

विचारांची व परंपराची जी श्रृंखला सातत्याने सुरु आहे, ती मोडीत काढणे म्हणजे मुक्ती होय. पुरुषांना व स्त्रीयांना समान हक्क आहेत. पण ही समानतेची 'मुक्ति' आपणांस फक्त कागदोपत्रीच दिसते. स्त्री ही जन्मापासून कुणाच्या ना कुणाच्या तरी अधिकारात वावरत असते. स्त्री सुशिक्षित झाली म्हणजे तिच्या बुध्दिला खाद्य मिळेल व ती समानतेसाठी भांडूही शकेल. त्याचप्रमाणे शिक्षणामुळे आर्थिक दृष्ट्याही स्वाबलंबी बनेल. त्यातूनच स्वावलंबनाची भावना स्त्रीमध्ये जागृत होऊन ती खंबीर बनण्यास मदत होईल. त्यामुळे स्त्री ही स्वत:ही मुक्ति घडवू शकते व सक्षम असू शकते. स्त्री वैचारिक दृष्ट्या ज्यावेळी स्वतंत्र होईल, खंबीर होईल, तीच खरी स्त्री मुक्ति !महिलांसाठी दिलेल्या ५० टक्के आरक्षणामुळे अनेक ठिकाणी म्हणा जसे महानगर पालीका, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांच्या हाती सत्ता आल्याचे दिसून येते. दिवसेंदिवस महिलांचा सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही सहभाग पाहता वावरही वाढत चाललेला आहे. भारताच्या राष्ट्रपती पदी आणि लोकसभेच्या अध्यक्षपदी, खासदार, आमदार, महापौर, सरपंच, नगरसेवक पदी, शिक्षण क्षेत्र असो वा क्रिडा असो, प्रत्येक क्षेत्रात महिला विराजमान व आघाडीवर आहेत. महिलांचे शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अधिक सक्षमीकरण करण्यासाठी व उन्नतीसाठी महिलांना ५० टक्के आरक्षण दिल्यामुळे त्या आता सहज माणसाबरोबर भिडून उलट त्यांच्या पेक्षा जास्त कुवत निर्माण करण्यात सिंहाचा वाटा उचलत आहे, त्यामुळे त्यांच्या जगण्याचा स्तर नक्कीच वाढतो आहे, यात तिळमात्र शंका नाही. अशा वेळी महिलांना वंचित ठेवता कामा नये. त्यांनाही संधीचं सोनं करु दयायला पाहिजे. महिलांना आपली कुवत सिध्द करण्यासाठी थोडी 'स्पेस' द्यावी तरच समानतेचा प्रवास योग्य दिशेने होतोय असे ठाम पणे म्हणता येईल. स्त्री ही परिवाराचा कणा असून तिच्या शिवाय घर हे सुने असते. विकसित भारताचे स्वप्न साकार करावयाचे असेल तर आपल्याला स्त्रीला समाजात, कार्यक्षेत्रात योग्य तो सन्मान दिलाच पाहिजे. समान संधी व समान अधिकार या दोन्हीचा जागरुकतापूर्वक वर्तन व्यवहार पुरुषांकडुन होणे गरजेचे आहे.वर्तमानपत्र हातात घेतल्यावर पहिल्याच पानावर रकानेचे रकाने वाचताक्षणी विचारांचे काहुर मनात थैमान घालतात, कारण महिलांवर बलात्कार, विनयभंग, खुन, अपहरण, लैंगिक अत्याचार दिवसें-दिवस वाढत आहेत. महिलांना असुरक्षितता सारख्या अशा अनेक समस्या भेडसावत आहेत. वीज, पाणी, बेराजगारी पेक्षा भयंकर अशी शोषण प्रणाली किळसवाणीच वाटायला लागली की कधी-कधी मनात सारखा विचार धुमसत असतो की, जे नराधम असे कृत्य करतात त्यांची त्याच ठिकाणी नांगी ठेचून संपवून टाकले पाहिजे. त्यानंतर उर्वरित कारवाई करावी. हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत असे सुरुच राहणार आहे, निर्बंध नावाची वस्तुच दिसेनासी झाली आहे. तेव्हा महिला दिन कां म्हणुन साजरा करायचा ? असा अनाकलनीय प्रश्न सारखाच निर्माण होतो. याला कारणीभुत शासनच आहे, असे म्हणायला हरकत नाही. तेंव्हा आता तरी शासनाने कठोर व कणखर असे कायदे तयार करावेत जेणेकरुन महिलांच्या इभ्रतीस तडा जाणार नाही, याची दखल घ्यावी लागेल.स्त्रीयांना परंपरागत गुलामगिरीतून काढून स्वातंत्र्य देण्याचे व तिचे उध्दार करण्याचे कार्य, भगवान बुध्द, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवांनी केले आहे, याला भारतीय इतिहासात तोड नाही. काळ जसा जसा पुढे सरकेल येणारी पिढी प्राचीन भारतातील गुलाम स्त्री व आधुनिक भारतातील स्वातंत्र्य स्त्रीयांचा तुलनात्मक अभ्यास करेल. तेव्हा संपूर्ण देश फुले-आंबेडकरांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्यापुढे झुकल्याशिवाय राहणार नाही, हे केवळ संविधानामुळेच हे तेवढेच खरे ! ८ मार्च महिला दिन तोंडावर असतांना लज्जास्पद गोष्टी समोर येत आहेत आणि आपण आदरासाठी भांडतो पण आपण जबाबदारीने वागतो कां ? याचा विचार प्रत्येक स्त्रीने करावा. आपला नवरा, आपली मुलं, सासु-सासरे, आई-वडील यांच्याकडे दुर्लक्ष करत किंवा त्यांना 'बाहेरुन ऑर्डर करा' असं सांगुन आपण खुशाल पाटर्या करत हिंडत बसायचं यात कसलं आलंय स्त्रीत्व ? प्लीज यावर विचार कराअध्यात्माची जोड आयुष्यात द्या, त्यामुळे आपण एका वेगळया लेव्हलवर (समानतेवर) कायमच राहतो.स्त्री व पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे. फक्त पुरुषानं आयुष्यभर सुखात राहावं आणि दु:खाचा सगळा भार स्त्रीयांच्या खांदयावर टाकावा, ही सुख-दु:खाची विभागणी आजही अव्याहत सुरु आहे, ती संपली पाहिजे. माणुस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे. कारण आजच्या काळातील स्त्री ही शिक्षणाने सक्षम झालेली आहे. पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. या सबबी नंतर स्त्रीने टोकाचं पाऊल उचलुन भरारी घेण्याचं ठरवलं आहे. आज ती शिक्षणापासुन राजकारणापर्यंतच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करुन कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीत आणि देशाचा नावलौकिक मिळविण्यात मोलाची भुमिका बजावत आहेत. कर्तबगार, कर्तव्यदक्ष, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणा या गुणांच्या जोरावर त्यांनी आपण कमी नसल्याचं वारंवार सिध्द केले आहे व आज ही करत आहे, अशा कर्तव्यदक्ष धाडसी वृत्तीच्या महिलांना जागतिक महिला दिना निमित्त मानाचा मुजरा !

# प्रादेशिक परिवहन कार्यालया तर्फे लाईसेंस कॅम्पचे आयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर तर्फे शिबीर कार्यालयाचे कामकाज सुरु करण्यात येत आहे. सदर शिबीरमध्ये शिकाऊ अनुज्ञप्ती व पक्के अनुज्ञप्ती पुर्वनियोजित ऑनलाईन नियुक्ती नुसार देण्यात येणार आहे. या बाबतचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.शिबीर ठिकाण १) शासकीय विश्रामगृह, वरोरा येथे २१ मार्च २०२४ रोजी २) शासकीय विश्रामगृह ब्रम्हपुरी, येथे २२ मार्च २०२४ ३) शासकीय विश्रामगृह, चिमूर येथे २६ मार्च २०२४ रोजी ४) शासकीय विश्रामगृह, गोंडपिंपरी येथे २७ मार्च ५) शासकीय विश्रामगृह, गडचांदुर येथे २८ मार्च २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

# पंचायत समिती चंद्रपूर येथे दिव्यांग स्वच्छतागृहाचे लोकार्पण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर तालुक्यातील पंचायत समिती स्तरावर १५ व्या वित्त आयोगातून बांधकाम करण्यात आलेले पहिले दिव्यांग स्वच्छतागृहाचे लोकार्पण गट विकास अधिकारी धनंजय साळवे यांच्या उपस्थितीत दिव्यांग कर्मचारी श्री. आघात, श्री पिदूरकर श्री. गिरडकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शासनाकडून दिव्यांग लाभर्थ्यांकरिता विविध योजना राबविण्यात येत आहे. स्वच्छभारत मिशन अंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना स्वच्छतागृह बांधकाम प्रोत्साहन पर अनुदान म्हणुन १२ हजार रुपये लाभ मिळत असते. याचाच एक भाग म्हणून शासकीय कार्यालयातील दिव्यांग कर्मचारी /ग्रामस्थ यांना स्वच्छतागृह वापर करण्याकरीता होणारा त्रास कमी व्हावा, याकरीता पंचायत समिती चंद्रपूर येथे दिव्यांग स्वच्छतागृहाचे आज रोजी लोकापर्ण करण्यात आले.या कार्यक्रमाला गट शिक्षणाधिकारी श्रीनिवास कांबळे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी आरती जगताप, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अभियंता श्री. बाराहाते, उप अभियंता श्री.कारेगौडा, तसेच कार्यालयीन अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

# केंद्रीय दारूगोळा भांडार पुलगावच्या जयदेवची आंतरराष्ट्रीय स्तरावर निवड




**पुलगाव । प्रतिनिधी**

गुजरातमधील अहमदाबाद येथे झालेल्या दुसऱ्या फायर फायटिंग गेम्समध्ये केंद्रीय दारूगोळा भांडार पुलगावच्या फायरमन जयदेवने ५ किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले . त्यामुळे जयदेवची भारतीय संघात निवड झाली. फायरमन जयदेव सप्टेंबर महिन्यात डेन्मार्क, युरोप येथे होणाऱ्या १५व्या जागतिक फायर फायटिंग गेम्समध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करेल. या यशाबद्दल केंद्रीय दारूगोळा भांडार पुलगावचे कमांडर ब्रिगेडियर कौशलेश पंघाल आणि सर्व लष्करी व नागरी अधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# राहुल भाऊराव जगताप यांचे अल्पशा आजाराने निधन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शंकरपूर येथील रहिवासी असलेले व भंडारा जिल्ह्यातील पवनी येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य सहाय्यक या पदावर कार्यरत असलेले राहुल भाऊराव जगताप वय ४० यांचा अल्पशा आजाराने गुरुवारी सकाळी आठ वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शंकरपूर येथील स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. असून त्यांच्या मागे आई पत्नी व दोन मुलं असा परिवार आहे.



# हुकूमशाहीचे सरकार घालून बहुजनांचे नवीन सरकार आणण्याची गरज-डॉ.सतिश वारजुकर

**चिमूर । प्रतिनिधी**

नागभीड शहरात रुख्मिणी सभागृहाच्या प्रांगणात बहुजन समाजातील नागरिकांकरिता जागतिक महिला दिनाचे औचित साधून राजे छत्रपती शिवाजी महाराज व फुले शाहू आंबेडकर यांचे विचार घराघरात पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय प्रबोधनकार मी वादळवारा फेम अनिरुद्ध वनकर व सुप्रसिद्ध गायिका तुम्ही खाता त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे र फेम कडूबाई खरात यांच्या शिवराय ते भिमराय या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा क्षेत्र डॉ.सतिश वारजुकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून संपूर्ण महापुरुषांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी माजी मंत्री महाराष्ट्र राज्य तथा महासचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी डॉ. अविनाश वारजुकर, सह उद्घाटक म्हणून महासचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी डॉ. नामदेवराव किरसाण, ओबीसी संघटक महाराष्ट्र प्रदेश धनराज मुंगले, गडचिरोली जिल्हा कांग्रेस कमिटी अध्यक्ष महिंद्र ब्राम्हणवाडे, जेष्ठ नेते पंजाब गावंडे, जेष्ठ नेते गोविंद भेंडारकर, जेष्ठ नेते फ्रफुल खापर्डे, अनमोल शेंडे , दिगांबर गुरपूडे, प्रा. राजेश कांबळे, प्रा. जगनाडे , विनोद बोरकर, खोजराम मरसकोल्हे, गजाजन बुटके, डॉ. रवींद्र कावळे, प्रमोद चौधरी, विजय गावंडे, रमाकांत लोंधे, साईश वारजूकर, पुरुषोत्तम बगमारे, विवेक कापसे, नैना गेडाम, नितु गुरपुडे, सुनिताडोईजड, माला मुळे, आशा गायकवाड, संपूर्ण सेलचे पुरुष ,महिला,युवक काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. डॉ.अविनाश वाजूकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून आज भारतीय जनता पार्टी घाबरली असून त्यांना विरोधी पक्षातील नेत्यांची गरज भासत आहे. देशातल्या अनेक स्वायत्त संस्था हाताशी घेऊन विरोधी पक्षांतील नेत्यांना तुरुंगात टाकण्याचा डाव केंद्रातील सरकार करीत आहे. समाजा समाजात द्वेष निर्माण करून हे सरकार सामाजिक असंतोष निर्माण करीत आहे. असे मत व्यक्त केले तर डॉ.नामदेव किरसाण यांनी देशातील अनेक संस्था अदानी व अंबानीला विकून त्यांना आर्थिक बळकट करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे देशात आर्थिक असमतोल निर्माण होत आहे. एकीकडे देश बळकट होत चालल्याचे सांगून दुसरीकडे ८० कोटी कुटुंबांना मोफत धान्य देत असल्याचे सांगून पाठ थोपटून घेत आहे हा विरोधाभास असून आज याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. डॉ सतीश वारजूकर यांनी आपल्या उदघाटनिय भाषणातून आज या देशात संविधान टिकवायचे असेल तर हे हुकूमशाहीचे सरकार घालून बहुजनांचे नवीन सरकार आणण्याची गरज निर्माण झाली आहे असे मत व्यक्त केले. तसेच येणाऱ्या निवडणुकीत यासाठी सर्व बहुजन समाजाने एकत्रित येऊन काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागभीड तालुका महिला अध्यक्ष प्रणया गड्डमवार,यांनी केले तर प्रास्ताविक अध्यक्ष चिमूर विधानसभा युवक काँग्रेस रोशन ढोक यांनी केले



# रोहयो मजूर मजुरी पासून वंचित

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत माहे डिसेंबर २३ पासून रोजगार हमीची कामे सुरू आहे. परंतु तीन महिन्यापासून मजुरांना पंचायत समितीकडून मजुरी न मिळाल्याने त्यांनी रोजगार हमीच्या कामाकडे पाठ फिरवली असून त्यांचे वर उपासमारीची वेळ आली आहे.

हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या संकल्पनेतून रोजगार हमी योजना सुरू झाली. त्यानुसार प्रती कुटुंब १०० दिवसाचा रोजगार उपलब्ध करून देण्याची हमी या योजनेद्वारे दिल्या गेली या योजनेतून कुसल व कुशल सार्वजनिक तसेच वैयक्तिक कामे करून मजुराला मजुरी दिल्या जाते. यावर्षी तालुक्यात मोठा दुष्काळ पडला असून मजूर वर्गाच्या हाताला काम नाही. त्यातच डिसेंबर पासून परिसरात रोजगार हमीची कामे सुरू झाल्याने मजुराला दिलासा मिळाला. परंतु डिसेंबर पासून हे मजूर कामाला असताना अजून पर्यंत या मजुरांना मजुरी मिळालेली नाही. त्यामुळे त्यांनी आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, असा यक्षप्रश्न मजुरासमोर निर्माण झालेला आहे. त्यामुळे या मजुरांनी रोजगार हमी योजनेच्या कामाकडे पाठ फिरवली आहे.चिमूर पंचायत समिती अंतर्गत अनेक योजनांचे अनुदान रखडले असतानाच रोजगार हमी योजनेच्या मजुराची मजुरी सुद्धा रखडली असल्याने परिसरातील रोजगार सेवक व मजूर वर्ग यांनी रोस व्यक्त केला आहे. या मजुरांना त्वरित त्यांच्या खात्यावर मजुरी देण्यात यावी, अशी मागणी चिमूर तालुक्यातील मजुरांनी केलेली आहे.



# महिला दिन विशेष ;मूलच्या तहसीलदार मृदुला मोरे यांचा सत्कार

**मूल । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने पक्षाचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार आणी इतर पदाधिकाऱ्याच्या उपस्थितीत महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर मूलच्या तहसीलदार मृदुला मोरे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देत शाल,श्रीफळ देऊन त्यांचे सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी तहसीलदार मोरे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत तहसीलदार या पदापर्यंत पोहोचल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अभिनंदन करून त्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी त्याच्याकडून मूल तालुक्यातील सर्वसामान्य व्यक्तीला भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याची अपेक्षा उपस्थित कार्यकर्त्याकडून व्यक्त करण्यात आली.तहसीलदार मृदुला मोरे यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा भेट देऊन केलेल्या सत्काराबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस च्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुल शहर अध्यक्ष आकाश येसनकर,महिला तालुका अध्यक्ष संगीता गेडाम,युवक तालुका अध्यक्ष रोहित कामडे,महिला शहर अध्यक्ष धाराताई मेश्राम, तालुका उपाध्यक्ष महेंद्र कोडापे,वैद्यकीय मदत कक्षाचे तालुका अध्यक्ष आनंदराव गोहने,सोशल मीडिया चे प्रमुख भावेश रामटेके,रोजगार आघाडीचे मुल शहर प्रमुख रजत कुकुडे,अल्पसंख्यांक चे शहर अध्यक्ष आशु खान,सुवर्णा रामटेके,माला शेंडे,रंजना सुखदेवे,सूरज गिरडकर,पंकज जवडे,साहिल खोब्रागडे, प्रणय रायपुरे,रोहित शेंडे,आदित्य गेडाम,दिपक लांबूवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# डॉ.प्रतिमा इंगोले यांच्या अध्यक्षतेत भद्रावतीत दिनांक १७ मार्चला सातवे स्मृतिगंध काव्यसंमेलन

## स्व.विणा आडेकर स्मृती प्रतिष्ठानचे आयोजन

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्व. विणा आडेकर स्मृती प्रतिष्ठान भद्रावतीच्या वतीने स्थानीक श्री मुरलीधर पाटील गुंडावार सभागृह येथे रविवार दिनांक १७ मार्च २०२४ ला सातवे स्मृतिगंध काव्यसंमेलन संपन्न होत आहे. नवोदीत व प्रथितयश काव्यप्रतिभेचा सन्मान आणि मराठी काव्य रसिकांच्या आस्वादकतेस प्रोत्साहन देण्यासाठी ह्या संमेलनाचे प्रयोजन आहे. संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व प्रसिध्द कवयित्री डॉ. प्रतिमा इंगोले दानापूर (अकोला), यांच्या अध्यक्षतेखाली प्रख्यात कवयित्री डॉ. संध्या पवार नागपूर, यांच्या शुभहस्ते या नियोजीत संमेलनाचे उद्घाटन सकाळी ठिक १०.३० वा. संपन्न होत आहे.

यावेळी प्रमूख अतिथी म्हणून ज्येष्ठ सहित्यिक आचार्य ना.गो.थुटे वरोरा, अनंत भोयर, सुप्रसिद्ध ग्रामीण कथाकार व कृषी तज्ज्ञ काटोल, डॉ. प्रकाश महाकाळकर गटशिक्षणाधिकारी प.स. भद्रावती, अमित गुंडावार सामाजिक कार्यकर्ते भद्रावती, ईत्यादी मान्यवर उपस्थित राहतील. भद्रावतीचे माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर या काव्यसंमेलनाचे निमित्ताने विशेष अतिथी म्हणून यावेळी उपस्थित असतील.प्रस्तूत काव्य संमेलन कवी आणि कवितेचा शब्द-भाव-अनुभूतीचा आनंदमेळाच असून, या एकदिवसीय काव्यसंमेलनात दोन कविसंमेलने व एका गझल मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. भरगच्च चार सत्रांमध्ये होत असलेल्या या साहित्यसोहळ्यात वाङ्मयीन चिंतनासोबतच काव्यामृताचे सिंचन होणार आहे.संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात संमेलनाध्यक्ष डॉ. प्रतिमा इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रीत कवींचे बहारदार कविसंमेलन संपन्न होत आहे. या प्रसंगी नामवंत कवी डॉ. विजय सोरते नागपूर,इरफान शेख चद्रपूर, धनंजय साळवे चंद्रपूर या मान्यवरांची उपस्थीती राहणार आहे. विदर्भातील प्रतिभाशाली कवी या संमेलनाला उपस्थित राहणार असून, मराठी काव्यरसिकांना ही एक मोठी पर्वणीच असणार आहे. तिसऱ्या सत्रात, प्रख्यात गझलकार लोकराम शेंडे बुटीबोरी, यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रीत कवींची गझल मैफिल रंगणार आहे. या मैफिलीमध्ये प्रतिथयश गझलकार जयवंत वानखेडे कोरपना, राम रोगे नांदाफाटा, सुरेश शेंडे गडचिरोली, गौतम राऊत ब्रम्हपूरी यांची उपस्थिती राहणार आहे. या निमित्ताने बहारदार गझलांचा आस्वाद गझल रसिकांना घेता येणार आहे.



संमेलनाच्या चौथ्या सत्रात प्रख्यात कवयित्री गीता देव्हारे-रायपुरे चंद्रपूर, यांच्या अध्यक्षतेखाली खुले कवी संमेलन संपन्न होत आहे. खुल्या कविसंमेलनात देखील प्रतिथयश व नवोदीत काव्यप्रतिभेची जुगलबंदी काव्यरसिकांना अनुभवता येणार आहे. या प्रसंगी ज्येष्ठ कवी दीपक शिव आनंदवन, सिमा भसारकर चंद्रपूर, गोपाल शिरपूरकर चंद्रपूर, जयंत लेंझे सिंदेवाही, आरती रोडे वरोरा, वसंत ताकघट चंद्रपूर, रमेश भोयर भद्रावती, देवेंद्र निकुरे नागभीड हे मान्यवर कवी मंचावर उपस्थित असतील.स्मृतिगंध काव्यसंमेलनाचे सदर आयोजन हे विदर्भस्तरीय असून, विदर्भातील प्रख्यात साहित्यिक व कवींचा मेळा या निमित्ताने भद्रावती नगरीमध्ये रंगणार आहे. मायबोली मराठी व मराठी साहित्यावर प्रेम करणाऱ्या काव्यरसिकांनी तसेच नवोदितांनी या संमेलनाचा लाभ घ्यावा असे आवाहन स्मृतिगंध काव्य संमेलनाचे संयोजक प्रवीण आडेकर यांनी केले आहे.

# गोंडपिपरी तालुक्यातील 'कुलथा' यात्रा महोत्सवाला सुरवात




**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

गोंडपिपरी तालुक्यातील कुलथा हनुमान मंदिर येथे सर्व धर्म समभावाचे दर्शन पाहायला मिळते.हनुमानजींच्या मूर्तीचे दर्शन घेणारे हजारो भक्त शिवरात्री,आषाढी एकादशीनिमित्त कुलथा यात्रा महोत्सवाला येतात हजारो भक्त दर्शनासाठी धार्मिक भावनेतून रांग लावतात.यावेळी हनुमानजीची मूर्ती त्यांचे दुःख दूर करतात हा तिथे येणाऱ्या प्रत्येक भाविकांचा आत्मविश्वास आहे.कुलथा हे गाव गोंडपिपरी - मूल मार्गावर वढोली येथून उजवीकडे ४ कि. मी अंतरावर आहे.अंधारी व वैनगंगा ह्या दोन्ही नद्यांच्या मधोमध वसलेले कुलथा गाव आहे.महाविरात्री निमित्त मोठी यात्रा भरत असते. दि.७ गुरुवार पासून यात्रा महोत्सवाला सूरवात झाली असून यात्रा महोत्सव १२ तारखेपर्यंत राहणार असल्याची माहिती हनुमान,शिव कुलथा मंदिराचे विश्वस्त कृष्णा पिदुरकर, बंडू फोपरे,खेत्री देवाडे,अशोक गौरकर यांनी दिली.यात्रा महोत्सवा निर्मित्य २० ते २५ हजार भाविक येथे दर्शनासाठी येतात.या गावातून भूमार्गाद्वारे प्राचीन काळामधील ऋषी मुनी 'घाटकूळ' ते 'राजगड' असा प्रवास करत असल्याची माहिती गावातील ज्येष्ठ नागरिक सांगतात .

# आदिवासी उमेदवारांसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण १ एप्रिल ते १५जूलैपर्यंत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आदिवासी उमेदवारांकरीता वर्ग-३ व वर्ग- ४ पदांकरीता घेतल्या जाणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेची तयारी करून घेण्याकरीता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, येथे स्पर्धा परिक्षा पूर्व प्रशिक्षण १ एप्रिल ते १५ जुलै २०२४ या कालावधीत घेण्यात येणार आहे.प्रशिक्षण १ एप्रिल २०२४ पासून सुरु होणार असून प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना दरमहा रु. १०००/- विद्यावेतन देय राहील. या प्रशिक्षण कालावधीत खालील अटीची पुर्तता करणाऱ्या अनूसूचित जमातीच्या (डढ) प्रवगातील आदिवासी उमेदवारांनी त्यांचे अर्ज दिनांक २२ मार्च २०२४ पर्यंत खालील पत्त्यावर सादर करावेत. अर्जामध्ये स्वत:चे पूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, आधार क्रमांक, जन्मतारीख, शैक्षणिक पात्रता, प्रवर्ग (जात), जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर यांचा नोदणी क्रमांक इत्यादी बाबींचा उल्लेख करावा व सोबत आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

अर्ज करण्यांकरीता एाश्रीूशपींउरीव असणे आवयक आहे. या करीता दि. २७ मार्च २०२४ रोजी मुलाखत आयोजित करण्यात आली आहे. तरी दि. २२ मार्च २०२४ पर्यंत कार्यालयात अर्ज सादर करावे आणि दि.२७ मार्च २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुलाखती करीता आदिवासी उमेदवारांकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय भवन, पहिला माळा, हॉल क्र.१९, चंद्रपूर येथे मुळ कागदपत्रासह उपस्थित राहावे. निवड यादी दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत प्रसिध्द कराण्यात येईल.प्रशिक्षणाच्या अटी : उमदेवार अनु.जमाती (डढ) आदिवासी प्रवर्गातील असावा. २)उमेदवाराचे किमान वय १८ते ३८ चे दरम्यान असावे. ३) उमेदवार किमान एच. एच.एस.सी परीक्षा उत्तीर्ण असावा. ४) उमेदवारांचे नाव जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर येथे नोंदणी केलेले असावे .आवश्यक कागदपत्रे : शाळा सोडल्याचा दाखला, २)जातीचा दाखला किंवा जात वैधता प्रमाणपत्र ३) मार्कशिट्स एसएससी / एचएचएससी /पदवी ४)आधार कार्ड, ५) जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर या कार्यालयाचे नोंदणी कार्ड .

# शैलेंद्र बारसागडे यांची राष्ट्रीय मानवाधिकार सुधार संघटनेच्या महाराष्ट्र सचिवपदी नियुक्ती

**तळोधी( बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील कन्हाळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव शैलेंद्र बारसागडे यांची राष्ट्रीय मानवाधिकार सुधार संघटन,नवी दिल्ली या संघटनेच्या महाराष्ट्र सचिव पदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली असून तसे नियुक्ती पत्र त्यांना प्राप्त झाले आहे.

शैलेश बारसागडे हे इंजीनियरिंग शाखेतून एज्युकेटेड आहेत.परिस्थितीवर मात करून लोकांच्या न्याय हक्कासाठी सतत लढत असतात. स्वाभिमानी,नेक आणि बाणेदारपणा हा त्यांचा स्थायीभाव असून ते सुस्वभावी आहेत.या त्यांच्या नियुक्ती बद्दल राष्ट्रीय मानवाधिकार सुधार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा.डॉ . मदन रामटेके,प्रदेश उपाध्यक्ष कार्तिक मेश्राम,महाराष्ट्र राज्य जनरल सचिव अविनाश लांडगे, वंचितचे जिल्हा कार्याध्यक्ष जयदीप खोब्रागडे,जिल्हा



कोषाध्यक्ष चंद्रभान रामटेके,मधु वानखेडे,जिल्हा महासचिव, मधुभाऊ उराडे,जिल्हा महासचिव सुभाष थोरात,प्रा.पुरानीक गोंगले,जिल्हाध्यक्ष नंदिनी बारसागडे,अनिकेत गोडबोले, जिल्हा युवा उपाध्यक्ष हर्षवर्धन कोठरकर,शहर युवा महासचिव श्रीकांत खोब्रागडे,जिवलग खोब्रागडे,पत्रकार राजेश बारसागडे,डॉ.साहेबराव बारसागडे,पत्रकार तुलोपचंद गेडाम,लिलाधार वंजारी,शुभम मंडपे,डॉ.बाळासाहेब बन्सोड इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# चिमूर येथील किड्झी स्कूल येथे दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन



**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर येथील किड्झी स्कूल येथे दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन मंगळवारी (ता. ५) करण्यात आले होते. या कार्यक्रमाला दंतचिकित्सक डॉ. प्रितम पोहनकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमात त्यांनी दातांची निगा कशी राखावी याविषयी मार्गदर्शन केले. या दंतचिकित्सा शिबिरात प्ले ग्रुप, नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनिअर केजीच्या सुमारे ३५ ते ४० विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांचे दात आणि आरोग्य निरोगी राहण्यासाठी डॉ. प्रितम पोहनकर यांनी विद्यार्थ्यांना ब्रश करण्याची पद्धत, कोणत्या पद्धतीने ब्रश वापरावे, तसेच दातांची निगा कशी राखायची, कोणते खाद्यपदार्थ खावे आणि कोणते खाऊ नये याबाबत मार्गदर्शन केले. हे दंतचिकित्सा शिबिर किडझी कॉन्व्हेन्टच्या को-ऑर्डिनेटर प्रियंका चांदेकर यांच्या मार्गदर्शनात पार पडला. या शिबिरासाठी तेजस मिसार , विद्या मडावी, संस्कृती बोकारे, अर्चना धापटे, भाग्यश्री भोपे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## मोदींच्या काळात देश कर्जात बुडाला

# आपण देशात नवा हुकूमशाह निर्माण केला-प्रकाश आंबेडकर

**मुंबई**-जागतिक बँकेच्या माहितीनुसार, मोदी सत्तेत येण्यापूर्वी देशातील प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर २४ रुपयांचे कर्ज होते. गेल्या १० वर्षाच्या कालावधीत दरडोई कर्जाचा आकडा ८४ रुपयांवर जाऊन पोहोचला आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली आहे. दरम्यान प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, एखाद्याला १० हजार पगार मिळत असेल आणि बँकेला १० हजार हप्ता द्यावा लागत असेल तर आपल्याकडे काही शिल्लक राहील का? अशावेळी आपण घरदार विकायला काढतो ना? २०२६ साली देश कर्जात बुडालेला असेल. आपल्याला घरातील भांडी विकावी लागतील, अशी परिस्थिती ओढावेल, असे वक्तव्य प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आपण देशात नवा हुकूमशाह निर्माण केला आहे. देशाची व्यवस्था एवढी बिघडवलेय की, कोर्टाला म्हणावे लागले की मीच आता निवडणूक अधिकारी. चंदिगडमध्ये भाजपने काय केले,भय निर्माण केले. कोर्टातदेखील अधिकारी खरे बोलत नाही. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी मते मोजली तेव्हा जिंकलेला माणूस हरलेला होता आणि हरलेला माणूस जिंकला होता, हे स्पष्ट झाले.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आज देशात तपासयंत्रणांकडून धाडी टाकल्या जात आहेत. गेल्या १० वर्षात सरकारने किती धाडी घातल्यात याचे आकडे द्यावेत. धाडी घालणे तुमचा अधिकार आहे. पण त्यापैकी कितीजणांना कोर्टाने शिक्षा सुनावली? उलट असे दिसत आहे की, गंगेत स्नान केल्यासारखा चोर भाजपमध्ये साफ होऊन जातो.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, नरेंद्र मोदी यांच्याकडून गुजरातच्या माणसांना एक वागणूक आणि इतरांना वेगळी वागणूक दिली जाते. तुम्ही मोदींना पुन्हा सत्तेत आणले तर पुढील पाच वर्षांमध्ये सर्वच कारखाने गुजरातला गेले म्हणून समजा. मला माहिती आहे की, तुम्हाला या गोष्टी पचवणे कठीण आहे. पण इथले कारखाने पळवलेत की नाही? मग उद्या पुन्हा ते पळवले जातील. मतांच्या रुपाने तुम्ही मोदींना त्या गोष्टीचे लायसन्स द्याल. त्यामुळे भाजपला मतदान करु नका.



## मित्रपक्षांना सन्मानजनक जागा देणार:महायुतीच्या जागावाटपावर देवेंद्र फडणवीसांचे विधान

**मुंबई**-महायुतीच्या जागावाटपाबाबत सध्या वेगवेगळ्या बातम्या समोर येत आहेत. महाराष्ट्रातील भाजपचे नेते जागावाटपावर चर्चा करण्यासाठी दिल्लीत गेले आहेत. त्यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत अतिशय महत्त्वाची बैठक होणार आहे. दरम्यान, दिल्लीत गेल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सध्या ज्या काही माध्यमांमध्ये चर्चा चालू आहेत त्या चूकीच्या आहेत. आमच्या मित्रपक्षांना आम्ही सन्मानजनक जागा देणार आहोत, असे विधान त्यांनी केले.

या बैठकीत भाजप मित्र पक्षांच्या ताब्यातील जागांवरही उमेदवार देण्याबाबत चर्चा होणार असल्याचा तर्कवितर्क राजकीय वर्तुळात लढवला जात आहे. विशेष म्हणजे भाजप तब्बल ३७ जागांवर उमेदवार उभे करणार आहे. तर शिंदे गटाला ८ आणि अजित पवार गटाला केवळ ३ जागा मिळणार असल्याची माहिती विशेष सूत्रांकडून मिळत आहे. दरम्यान,



जागावाटपाची बातमी समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आल्यानंतर आता भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांकडून सावध भूमिका घेण्यात आली. महायुतीतील मित्रपक्षांना सन्मानजनक जागा दिल्या जातील, असं स्वत: उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.खरं म्हणजे ही पतंगबाजी आहे. एक आकडी जागा मिळणार किंवा तितकेच मिळणार वगैरे, मला असं वाटतं की, अशाप्रकारे पतंगबाजी करणं अतिशय अयोग्य आहे. आमचे जे दोन्ही साथीदार आहेत त्यांना आम्ही योग्य सन्मानाप्रमाणे जागा देऊ. त्यामुळे मीडिया स्वत:हून ठरवत आहे की, एवढ्या जागा मिळणार, तेवढ्या जागा मिळणार ते बंद केलं पाहिजे. ही न्यूज धादांत चुकीची आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महायुतीतील मित्रपक्षांना सन्मानजनक जागा दिली जाणार आहे. महायुतीच्या जागावाटपाबाबत माध्यमांत आलेले आकडे हे चुकीचे आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत प्रसारमाध्यमांना याबाबत प्रतिक्रिया दिली. दरम्यान, महाराष्ट्रातील महायुतीची अंतिम जागावाटपाची बैठक दिल्लीतच होणार आहे. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या हायकमांडचे दिग्गज नेते असणार आहेत, असेही सांगितले जात आहे.

## महाराष्ट्राने शरद पवारांना साथ दिली सहन करण्याचा प्रश्नच नाही-जयंत पाटील

**मुंबई**-शरद पवारांचा शून्यातून जग निर्माण करणे ते इथेपर्यंतचा प्रवास महाराष्ट्राने पाहिला आहे. महाराष्ट्राने शरद पवारांना साथ दिली. सहन करण्याचा प्रश्नच कधी उद्भवला नाही. पवारांनी सगळ्या महाराष्ट्रातील जाती धर्मांना बरोबर घेऊन राजकारण केले. त्यामुळे त्यांना आज शरद पवार म्हणतात, असे शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या टीकेनंतर विधान करत त्यांना प्रत्युत्तर दिले आहे.

दरम्यान जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रातील लोक-तरूण पवारांना मानतात. किल्लारीचा भूकंप झाल्यानंतर तेथील जनतेचे जीवन उभे करण्याचे काम शरद पवारांनी केले. हे महाराष्ट्र विसरला नाही, असे त्यांनी म्हटले आहे.जयंत पाटील म्हणाले की, शून्यातून जग निर्माण करणारा ते इथपर्यंतचा प्रवास महाराष्ट्र ने त्यांचा बघितला महाराष्ट्राने त्यांना साथ दिली. सहन करण्याचा प्रश्न कधी उद्भवला



नाही आणि त्यांनी महाराष्ट्रातल्या सगळ्या जाती-धर्मांना बरोबर घेऊन राजकारण केले आणि म्हणून त्यांना आज शरद पवार म्हणतात. आज महाराष्ट्रात सर्व मान्यता आणि नेतृत्व म्हणून पवार साहेबांना मानतात. राज्यातील अनेक तरुण त्यांच्या पाठिशी आजही आहेत. अगदी बुक भूकंप झाला आपल्या भूकंपात पुन्हा लोकांचे जीवन उभा करण्याचे काम हे महाराष्ट्र विसरलेला नाही, असे त्यांनी म्हटले आहे.सोनिया गांधी यांचा उद्देश मुलाला पंतप्रधान करण्याचे आहे.उद्धव ठाकरे यांना आदित्यला आणि शरद पवार यांना सुप्रिया सुळेंना मुख्यमंत्री करायचे आहे. ममता बॅनर्जी भाच्याचे तर एम. के स्टॅलिन मुलाचे भवितव्य शोधण्यात व्यस्त आहेत. शरद पवारांना महाराष्ट्राची जनता ५० वर्षापासून सहन करतेय. विरोधी पक्ष 'लोकशाही' नव्हे तर घराणेशाही' जपण्यात 'मस्त' आहे. नरेंद्र मोदी मात्र विकसित भारताचे स्वप्न साकारण्यात व्यस्त आहे, असे म्हणत अमित शाहांनी विरोधकांचा समाचार घेतला होता. इंडिया आघाडीतील सर्व पक्ष हे घराणेशाही मानणारे आहेत. इंडिया आघाडीतील पक्षातील वरिष्ठ नेते कुटुंबातील सदस्यांना मोठे करायचे आहे, असे त्यांनी म्हटले.

## विदर्भ,मराठवाड्यात अवकाळीचे सावट बीड,हिंगोली,अमरावतीत पावसाचा अंदाज

**पुणे**-राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यात आज पावसाची शक्यता आहे. सध्या राज्यात सकाळी थंडी आणि दिवसा उन्हाचा चटका असे वातावरण अनुभवायला मिळत आहे. मात्र आज आज विदर्भ, मराठवाड्यावर अवकाळी पावसाचे ढग कायम आहेत.

हवामान विभागाच्या माहितीनुसार पुढील २४ तासांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील बीड, हिंगोली, परभणी आणि अमरावतीमध्येही हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर काही भागांमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीटीचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.दरम्यान, राज्यासह देशातील काही भागात सकाळी थंडी जाणवत आहे. दुपारी उन्हाचा चटका आणि सकाळी थंडी अशी स्थिती आहे. सध्याची थंडी ही पश्चिमी झंजावातामुळे जाणवत आहेत, असे हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले.ऑक्टोबर महिन्यात सुरू होणारे पश्चिमी झंजावात मार्च



अखेर मंदावतात. परिणामी महाराष्ट्रासारख्या मध्य भारतातील राज्यात थंडीचा जोर मार्चमध्ये हळूहळू ओसरतो. सध्या खानदेश, नाशिक, नगर, पुणे, सातारा, मुंबईसह कोकण भागत समुद्रसपाटीपासून साधारण एक किलोमीटर उंचीच्या हवेच्या जाडीत तंतोतंत उत्तरेकडून पाऊस व बर्फावरील थंड वारे दक्षिणेकडे वाहत आहे. त्यामुळे ८ मार्च महाशिवरात्री पर्यंत किंवा त्यानंतर चार ते पाच दिवस महाराष्ट्रात गारवा टिकून राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर मात्र किमान व कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.

## उद्धव ठाकरे धाराशिव दौऱ्यावर

## जनसंवाद मेळाव्यातून घालणार भावनिक साद,ठाकरे गटाने लोकसभेसाठी कंबर कसली

**धाराशिव**-ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे आजपासून धाराशिव दौऱ्यावर आहेत. राज्यातील सत्ताबदलानंतर उद्धव ठाकरे पहिल्यांदाच दौऱ्यावर येत असून धाराशिव मतदारसंघात औसा, उमरगा, तुळजापूर, कळंबव भूम या पाच तालुक्यात उद्धव ठाकरे यांची तोफ धडाडणार आहे. दरम्यान, धाराशिवचा गड ताब्यात ठेवण्यासाठी ते आज शिवसैनिकांना भावनिक साद घालणार आहेत.मी माझ्या कुटुंबाशी संवाद साधण्यासाठी आल्याचे सांगत उद्धव ठाकरे मतदारांना भावनिक साद घालत आहेत. सहापैकी पाच विधानसभा मतदारसंघात त्यांच्या सभा होणार आहे.




यापैकी तीन सभा गुरूवारी तर दोन सभा शुक्रवारी होणार आहेत. गुरूवारी लातूर जिल्ह्यातील औसा येथे सकाळी, धाराशिव जिल्ह्यातील उमरगा येथे दुपारी तर तुळजापूर येथे सायंकाळी सभा होणार आहे. याशिवाय धाराशिव येथील शासकीय विश्रामगृहावर ते मुक्कामी असणार आहेत. शनिवारी सकाळी कळंब येथे तर सायंकाळी भूम येथे त्यांची सभा होईल. तर दुपारी परंडा येथे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांशी ते संवाद साधणार आहेत.बाळासाहेबांवरील प्रेम, कट्टर शिवसैनिक, जनसंपर्काच्या जोरावर मतदार आतापर्यंत शिवसेनेशी एकनिष्ठ राहिला आहे. २०२४ मध्ये शिवसेनेला पहिल्यांदाच ज्यांच्याविरोधात आतापर्यंत राजकारण केले, त्यांची मदत घ्यावी लागणार आहे. राष्ट्रवादीमध्येही फाटाफूट झाल्याने काही नेते अजित पवार गटाकडे आहेत. तुळजापूर व उमरगा तालुक्यातील काही भाग वगळता काँग्रेसची ताकद फारशी नाही. कळंब-धाराशिव हा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याने उर्वरित ठिकाणी विद्यमान खासदारांचा संपर्कच महत्वाचा ठरेल.दरम्यान, धाराशिवमध्ये शिवसेनेकडून विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर हे उमेदवार असण्याची शक्यता आहे. त्यांच्याविरोधात महायुतीचा उमेदवार ठरला नसला तरी फुटलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व काँग्रेसकडून शिवसेनेला किती मदत मिळेल, याचे उत्तर निवडणूक निकालाच्या आकडेवारीवरूनच स्पष्ट होईल..

## माझे सगळे भाऊ माझ्या पाठिशी

# पवार कुटुंबातील सर्व भाऊ,वहिनी,मुले माझ्यासाठी म्हणजे बहिणीसाठी उभे आहेत-सुप्रिया सुळेंचा दावा

पुणे (वृत्तसंस्था)-अजित पवार यांच्या बंडखोरीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडली. विशेषतः यामुळे पवार कुटुंबातही दुफळी निर्माण झाली. पण राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आजही पवार कुटुंबातील आपले सर्व भाऊ, वहिनी व मुले माझ्यासाठी म्हणजे आपल्या बहिणीसाठी ठामपणे उभे असल्याचा दावा केला आहे. यामुळे निवडणुकीच्या मैदानात अजित पवार एकटे पडले की काय? अशी चर्चा सुरू झाली आहे. बारामती लोकसभा मतदार संघात विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचे आव्हान मिळेल अशी चर्चा रंगली आहे. या दोन्ही महिला नेत्या सध्या हा मतदार संघ पिंजून काढत आहेत. या ठिकाणी कुणाचे पारडे जड ठरणार? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असताना सुप्रिया सुळे यांनी आपल्या पाठिशी सर्वच पवार कुटुंब असल्याचा दावा केला आहे.यंदाची माझी चौथी निवडणूक आहे. माझे सर्वच सहकारी, कार्यकर्ते हे माझे कुटुंब आहे. माझ्या या कुटुंबातील लोक माझा प्रचार करत आहेत. तसेच पवार कुटुंबातीलही माझे सर्व भाऊ, वहिनी, माझ्या घरातील मुले, राजूदादा, वहिवनी आदी सर्वजण आपल्या बहिणीच्या म्हणजे माझ्या पाठिशी उभे आहेत. त्याचा मला आनंद आहे. त्यांचा मला आधारही वाटतो, असे सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.सुप्रिया सुळे यांनी यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शरद पवार यांच्यावर केलेली टीकाही फेटाळून लावली. मागील ५५ वर्षांत महाराष्ट्रात कोणताही नेता आला तरी, शरद पवारांना नावे ठेवतोच. कारण त्याशिवाय त्यांची हेडलाईन होत नाही. त्यामुळे अमित शहांना शरद पवारांवर टीका करावी लागली. त्यांनीही हेडलाईनसाठी पवीारांवर टीका केली, असे त्या म्हणाल्या.सध्या आमची लोकसभा निवडणुकीची तयारी सुरू आहे. आम्ही जनतेच्या सुख दुःखात सहभागी होत आहोत. मी नेहमीसारखाच ज्येष्ठांच्या आशीर्वादाने प्रचाराला सुरुवात केली आहे. ज्यांची माझा प्रचार करण्याची इच्छा असेल, त्यांनी करावा. निवडणूक विचारांनी लढली जाते. आमच्यावर टीका झाली. पण एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही ही चांगली गोष्ट आहे. अमित शहांनी जी टीका केली तो त्यांचा अधिकार आहे, असेही सुप्रिया सुळे यावेळी बोलताना म्हणाल्या.सुप्रिया सुळे यांनी यावेळी गत ३ तारखेला आपली किंवा शरद पवार यांची देवेंद्र फडणवीस यांच्याशी कोणतीही भेट झाली नसल्याचेही स्पष्ट केले. यासंबंधी माध्यमांत सुरू असलेल्या चर्चेत कोणतेही तथ्य नाही, असे त्या म्हणाल्या.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .